**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभाग**
विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
तिसरा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवा कर भवन, माझगाव, मुंबई ४०० ०१०.

संदर्भ क्र. १. वित्त विभाग शा.नि. क्र. विकवि-१०१९/प्र.क्र. २८/वि.प्र. ४, दि.१५.०३.२०२४
२. कार्यालयीन आदेश क्र. राज्यकर आयुक्त/२०२३/विराआ-रासआ नियंत्रण/पुनर्रचना कक्ष/ धा.क्र.८२, दि.०७.०८.२०२३
३. कार्यालयीन आदेश क्र. राकअ-२०२४/आस्थापना-२/रासआ/नियुक्ती/ब-५८९ मुंबई दि. १९.०६.२०२४

## कार्यालयीन आदेश

आदेश क्र.:विराआ/२०२४/आस्था-३/जनसंपर्क नियंत्रण/पुनर्रचना कक्ष/धा.क्र. ८२/ब 914 दि. 26.09.2024

उपरोक्त संदर्भ क्र.०२ नुसार जनसंपर्क कार्यालय (PRO) या कार्यशाखेवर राज्यकर सहआयुक्त, नोडल-२ मुंबई यांचे प्रशासकीय नियंत्रण असेल असे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

संदर्भ क्र. ०३ च्या आदेशानुसार राज्यकर सहआयुक्त, अन्वेषण-क, मुंबई महाविकास सांकेतांक (MUM-INV-F-००३) या रिक्त पदाचा कार्यभार षण्मुगराजन एस. भा.प्र.से. यांच्याकडे सोपविण्यात आला होता. तसेच जनसंपर्क विभाग (PRO) संदर्भातील कामकाज हे अतिरिक्त कामकाज म्हणून सोपविण्यात आले होते.

संदर्भ क्र. १ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन प्रशासकीय सोयीसाठी व कार्यालयीन कामकाजाच्या सुलभीकरणासाठी या आदेशान्वये जनसंपर्क कार्यशाखेचे प्रशासकीय नियंत्रण राज्यकर सहआयुक्त (प्रशिक्षण) यांच्याकडे देण्यात येत आहे.

राज्यकर सहआयुक्त (प्रशिक्षण) हे जनसंपर्क (PRO) संबंधित कामकाज अपर राज्यकर आयुक्त, परिक्षेत्र - ०४, मुंबई महाविकास सांकेतांक (MUM-ZON-G-०००४), मुंबई यांच्या पर्यवेक्षणाखाली पाहतील, व जनसंपर्क (PRO) कार्यालयाशी संबंधित धारिण्या अपर राज्यकर आयुक्त, परिक्षेत्र - ०४, मुंबई महाविकास सांकेतांक (MUM-ZON-G-०००४), मुंबई यांच्यामार्फत सादर करतील.

या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

(मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने.)

(अभय महाजन) २६.०९.२४
भा.प्र.से.
विशेष राज्यकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:
१. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व अपर राज्यकर आयुक्त
३. राज्यकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी
४. सर्व कार्यासन अधिकारी, आयुक्तांचे कार्यालय
५. निवडनस्ती
६. स्थळ प्रत.